महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
Website : www.ropune.org.in

४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत,
बहिरट पाटील चौक, शिवाजीनगर, पुणे ४११०१६.

**जा.क्र.** तंशिविकापू/शैक्षणिक वि -६ / २०२६ / 3769 **दिनांक:** ०६ ऑक्टोबर २०२६

**महत्वाचे परिपत्रक:**

**प्रति,**
संचालक / प्राचार्य,
अशासकीय अनुदानित व खाजगी विनाअनुदानित,
विद्यापीठ विभाग, बीबीए-बीसीए पदवी अभ्यासक्रमाच्या संस्था,
पुणे विभाग.

**विषय :** शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ मधील तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत असलेल्या पदवी बीबीए-बीसीए अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या प्रवेश गुणवत्ता याद्या पडताळणी व प्रवेश मान्यतेची प्रक्रिया...

**संदर्भ :** महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे नियमन) अधिनियम, २००५ दि. १७.०८.२०१५.

शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ मधील संचालनांतर्गत असलेल्या व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया पूर्ण झालेली आहे. महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे नियमन) अधिनियम, २००५ मधील कलम ९(५) च्या तरतुदीनुसार प्रवेशित विद्यार्थ्यांच्या मान्यतेबाबतची कार्यपद्धती विहित करण्यात आलेली आहे.

त्याअनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ करिता या विभागीय कार्यालयाच्या सर्व अशासकीय अनुदानित व खाजगी विनाअनुदानित, विद्यापीठ विभाग, विद्यापीठ नियंत्रित संस्था, खाजगी विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशित विद्यार्थ्यांची प्रवेश मान्यतेची तपासणी करण्यासाठी सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे यांना प्राधिकृत केले आहे.

या विभागीय कार्यालयांतर्गत येणाऱ्या जिल्ह्यांमधील संस्थांच्या शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ मधील पदवी बीबीए-बीसीए अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्यांच्या मूळ कागदपत्रांची पडताळणी सोबत जोडलेल्या यादीनुसार आपल्या जिल्ह्यातील तपासणी केंद्रावर **दिनांक १२/१०/२०२६ ते २१/१०/२०२६** या कालावधीत जाऊन करावयाची आहे.

या विभागीय कार्यालयाच्या अखत्यारीतील बीबीए-बीसीए पदवी अभ्यासक्रम राबविणाऱ्या सर्व संस्थांना सूचित करण्यात येते की, तपासणी केंद्रांकडील तपासणी वेळापत्रक / संस्थेस वाटप केलेले तपासणी अधिकारी यांची यादी या विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. आपल्या जिल्ह्यातील तपासणी केंद्राद्वारे प्रसिद्ध केलेल्या वेळापत्रकानुसार अथवा तपासणी केंद्राद्वारे आपल्या संस्थेस वाटप केलेल्या तपासणी अधिकाऱ्यास संपर्क करून प्रवेश प्रक्रियेसंदर्भात काम करणारे अधिकारी/कर्मचारी यांनी आवश्यक कागदपत्रांसह जिल्हा तपासणी केंद्रात उपस्थित राहावे. सदर तपासणीसाठी उमेदवारांची सर्व आवश्यक मूळ कागदपत्रांसोबत Receipt cum Acknowledgment of confirmation of admission (Institute Reporting) ची प्रत घेऊन यावे. तसेच प्रवेश यादी पडताळणीसाठी राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या संकेतस्थळावरील आपल्या संस्थेमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांच्या यादीची १ प्रत (प्राचार्यांचे नाव

व स्वाक्षरी, शिक्क्यासह) घेऊन यावे. राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्षाच्या संकेतस्थळाव्यतिरिक्त अन्य यादी (उदा. MS Word File इत्यादी) पडताळणीसाठी स्वीकारली जाणार नाही.

सर्व संस्थांनी नेमून दिलेल्या दिवशी तपासणी केंद्रांकडून आपली प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी व त्यांची मूळ कागदपत्रे तपासून घेण्यात यावी . तद्नंतर या विभागीय कार्यालयाकडून तपासणी प्रमाणपत्र प्राप्त करण्यासाठीचे स्वतंत्र वेळापत्रक या विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात येईल. पडताळणी केलेल्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या याद्या (पडताळणी प्रमाणपत्रासह) संस्थांनी प्रवेश नियामक प्राधिकरणाकडे विहित कालावधीत सादर करणे आवश्यक आहे. विहित कालावधीत प्रवेशित विद्यार्थ्यांच्या याद्या (पडताळणी प्रमाणपत्रासह) प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांच्याकडे सादर न केल्यास संस्थांना दंडात्मक कारवाईस सामोरे जावे लागेल. तसेच प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांच्या सूचनेनुसार सदर प्रवेश याद्या ऑनलाईनरीत्या सुद्धा सादर करणे आवश्यक आहे. त्याबाबत आपणास स्वतंत्र परिपत्रकाद्वारे कळविण्यात येईल.

महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे नियमन) अधिनियम, २००५ मधील तरतुदी तसेच वेळोवेळी पारित झालेले प्रवेश नियम / शासन निर्णय / अधिसूचना / न्यायालयीन आदेश व विहित केलेल्या नियमांनुसार प्रवेश पडताळणी अहवाल प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई या कार्यालयास विहित कालमर्यादेत सादर न झाल्यास शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ मधील व्यावसायिक अभ्यासक्रमांतील प्रवेशित विद्यार्थ्यांना (प्रवेशांना) प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांची अंतिम मान्यता प्रदान होणार नाही व त्या अनुषंगाने विद्यार्थ्यांच्या प्रवेश मान्यतेबाबत भविष्यात कोणताही अनुचित प्रकार घडल्यास त्यास सर्वस्वी संबंधित संस्था जबाबदार राहील, याची सर्व संस्थाप्रमुखांनी नोंद घ्यावी.

( डॉ.सु.आ.पाटील )
प्र. सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे

प्रत : १) प्रोग्रामर , तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय पुणे यांना तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळा वर प्रदर्शित करण्याकरिता

गुणवत्ता यादी प्रमाणपत्र/गुणपत्रिका तपासणी ज्या ठिकाणी करावयाची अशा कार्यालयाची/संस्थांची यादी.

| अ.क्र. | **गुणवत्ता यादी (प्रमाणपत्र/गुणपत्रिका) तपासणी करणारी संस्था** | **संस्थांचे जिल्हे** |
|---|---|---|
| १ | तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय , पुणे | **पुणे** जिल्ह्यातील सर्व पदवी बीबीए/बीसीए अभ्यासक्रमाच्या संस्था. |
| २ | शासकीय तंत्रनिकेतन, कराड | **सातारा** जिल्ह्यातील सर्व पदवी बीबीए/बीसीए अभ्यासक्रमाच्या संस्था. |
| ३ | शासकीय तंत्रनिकेतन, मिरज | **सांगली** जिल्ह्यातील सर्व पदवी बीबीए/बीसीए अभ्यासक्रमाच्या संस्था. |
| ४ | शासकीय तंत्रनिकेतन, सोलापूर | **सोलापूर** जिल्ह्यातील सर्व पदवी बीबीए/बीसीए अभ्यासक्रमाच्या संस्था. |
| ५ | शासकीय तंत्रनिकेतन, कोल्हापूर | **कोल्हापूर** जिल्ह्यातील सर्व पदवी बीबीए/बीसीए अभ्यासक्रमाच्या संस्था. |

# तपासणी सूची (Checklist)

- संस्थेचे संपूर्ण नाव व डीटीई कोड :
  ______________________________________________________________
- प्राचार्यांचे नाव व मोबाईल नंबर :
  ______________________________________________________________
- संस्थेचा फोन (लँडलाईन) नंबर :
  ______________________________________________________________
- गुणवत्ता यादी तपासण्यासाठी आलेल्या प्रतिनिधीचे नाव व मोबाईल नंबर : ____________________

| अ.क्र. | तपशिल | संस्थेचा शेरा (आहे / नाही / लागू नाही) | पडताळणी अधिकाऱ्याचा शेरा |
|---|---|---|---|
| १ | राज्य सामाईक चाचणी कक्ष मुंबई यांच्या संकेतस्थळावर बीबीए-बीसीए प्रथम वर्षाच्या प्रवेशित विद्यार्थ्यांची शाखानिहाय यादीची तपासणीपूर्वी एक दिवस अगोदर काढलेली प्रिंट १ प्रतीत (प्राचार्यांचे नाव/सही शिक्क्यासह). राज्य सामाईक चाचणी कक्ष मुंबई यांच्या संकेतस्थळा व्यतिरिक्त अन्य यादी (उदाहरणार्थ MS Word File etc.) पडताळणीसाठी स्वीकारली जाणार नाही. | | |
| २ | प्रवेश यादी पडताळणीसाठी सादर करताना संस्थेस सक्षम प्राधिकरणाची पीसीआय / एआयसीटीई / मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई व महाराष्ट्र शासन यांचे परवानगी / प्रवेश क्षमता वाढ व मुदत वाढ (EOA) परवानगी बाबतचे पत्र. | | |
| ३ | शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ मध्ये नव्याने सुरु झालेल्या संस्थांची प्रथम वर्षाकरीताची तसेच नवीन अभ्यासक्रम वाढ केल्याबाबत संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय मुंबई व संस्थाप्रमुख यांची संयुक्त नावे आवश्यक रकमेची मुदतठेव पावती / प्रमाणपत्राची प्राचार्यांनी साक्षांकित केलेली छायांकित प्रत | | |
| ४ | शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ मध्ये ज्या संस्थांना AICTE यांचेकडून प्रवेशक्षमता वाढ घट/ , अभ्यासक्रमांच्या नावात बदल तसेच संस्थेच्या पत्त्यात बदल इ प्रकरणी परवानगी देण्यात .आलेली असल्यास अशा संस्थांनी शासनास भरणा करावयाचे नोंदणी शुल्क जमा केलेल्या पावतीची छायांकित प्रत जोडावी | | |
| ५ | शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ मध्ये नवीन संस्थानवीन अभ्यासक्रम सुरु / करणे, प्रवेशक्षमतेत वाढ करणे इत्यादी यासाठी संबंधित शिखर परिषद व शासन यांनी दिलेल्या मान्यतेच्या अनुषंगाने तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई यांनी निर्गमित केलेले अंतिम मान्यता पत्र. | | |
| ६ | संस्थास्तरावरील आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर शिल्लक राहिलेल्या जागांवरील ( ACAP) प्रवेशाकरीता संस्थेने संकेतस्थळावर प्रसिद्ध केलेली जाहिरात, अर्ज मागविण्यासाठी कालावधी, प्राप्त झालेल्या सर्व अर्जांची गुणवत्ता यादी | | |

| | | | |
|---|---|---|---|
| ७ | संस्थेतील अभ्यासक्रमांच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे तसेच संस्थास्तरावरील प्रवेश निश्चित करताना उमेदवारांच्या प्रवेशाच्या संबधीत सर्व कागदपत्रांची संस्थेच्या प्राचार्यांनी/संस्थाप्रमुखांनी आवश्यक ती पडताळणी केलेली असल्याचे संस्थाप्रमुखांनी प्रमाणित केलेले पत्र प्रवेशित विद्यार्थ्यांच्या यादीसोबत जोडणे आवश्यक आहे ( सोबत जोडलेल्या नमुन्याप्रमाणे ). | | |
| ८ | शुल्क परताव्याबाबत आणि मूळ कागदपत्रे परताव्याबाबत आपल्या संस्थेबद्दलच्या तक्रारींची संस्थाप्रमुखांनी दखल घेऊन त्यांचे निराकरण करावे व शुल्क परताव्याबाबत कोणतीही तक्रार नसल्याचे प्रमाणपत्र संस्थेच्या प्राचार्यांनी प्रवेश यादी पडताळणी वेळी सादर करावे (सोबत जोडलेल्या नमुन्याप्रमाणे ). | | |
| ९ | अल्पसंख्यांक दर्जा प्राप्त संस्थांनी त्यांना अल्पसंख्यांक विकास विभागाने प्रदान केलेल्या अल्पसंख्यांक दर्जा प्रमाणपत्र (वैध कालावधीचे) मूळ प्रत व संस्थाप्रमुखांनी साक्षांकित केलेली प्रत प्रवेश यादी पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक आहे. तसेच शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ व २०२५-२०२६ मधील मंजूर प्रवेशित याद्यांची छायाप्रत सोबत जोडावी | | |
| १० | एखाद्या विशिष्ट प्रकरणी मा. सर्वोच्च न्वयायालयाने आणि मा. उच्च न्यायालयाने काही निर्देश दिले असल्यास त्यानुसार त्यासंबंधी सर्व कागदपत्रे (साक्षांकित केलेली छायांकित प्रत) जोडावीत. | | |
| ११ | विद्यार्थी, विद्यार्थिनी, महिला, मागासवर्गीय व सर्वसाधारण अधिकारी/कर्मचारी यांच्या तक्रारींचे निवारण करण्याकरिता शिखर परिषद/शासन निर्णय / महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ यांचे निर्देशानुसार स्वतंत्र समित्या गठित केल्याबाबतची कागदपत्रे सोबत जोडावीत. | | |
| १२ | या विभागीय कार्यालयाकडून मागविण्यात आलेल्या माहितीबाबत गुगल फॉर्मवर भरलेली माहितीची पोहोच पावती (भटक्या जनावरां बाबतची माहिती/निवडणूक साक्षरता क्लब/एमपीएससी परीक्षा केंद्र/POSH Act अंतर्गत संस्थेची माहिती She Box Portal वर अपलोड केलेबाबत | | |
| १३ | प्रवेशित विद्यार्थ्यांच्या यादीमधील अनुक्रमांकानुसार विद्यार्थ्यांची मूळ कागदपत्रे तपासण्यासाठी लावण्यात यावीत: Receipt cum Acknowledgment of Confirmation of Admission, शैक्षणिक गुणपत्रिका, शाळा सोडल्याचा दाखला, जातीचे प्रमाणपत्र, नॉन-क्रीमीलेअर प्रमाणपत्र ( (३१ मार्च २०२७ पर्यंत वैध व विहित मुदतीत प्राप्त झालेले असावे), अधिवास/राष्ट्रीयत्व प्रमाणपत्र, शैक्षणिक खंड असल्यास गॅप प्रमाणपत्र, महाराष्ट्राबाहेरील विद्यार्थ्यांसाठी Eligibility/Migration Certificate, TFWS उमेदवारांसाठी उत्पन्नाचा दाखला आवश्यक राहील. ( मूळ प्रमाणपत्रांखेरीज कोणतेही झेरॉक्स प्रती व अनावश्यक कागदपत्रे मूळ प्रमाणपत्रासोबत जोडण्यात येऊ नयेत.) | | |

*(संस्थेच्या लेटरहेडवर प्रिंट काढण्यासाठी)*

जावक क्रमांक : दिनांक :

संस्थेचा डीटीई कोड :

**शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ प्रवेशासंबंधी कागदपत्र पडताळणी प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ च्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये व संस्थास्तरावर प्रवेश प्रक्रियेमध्ये--------------------------------------------------------------------------- **[संस्थेचे नाव व डीटीई कोड]** या संस्थेमध्ये प्रथम वर्ष **बीबीए-बीसीए** अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक अर्हतेसंबंधीची आवश्यक मूळ कागदपत्रे / प्रमाणपत्रे (शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ साठी महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागामार्फत प्रसिद्ध करण्यात आलेल्या पूर्ण वेळ पदवी अभ्यासक्रमांचे माहिती पुस्तिकेमध्ये नमूद केल्याप्रमाणे) यांची पडताळणी केलेली असून ती बरोबर आहेत. तसेच सामाजिक आरक्षणांतर्गत VJ/DT(NT-A)/NT(B)/NT(C)/NT(D)/SBC/OBC या मागास प्रवर्गांतर्गत प्रवेशित विद्यार्थ्यांचे ३१ मार्च २०२७ पर्यंत वैध असलेले व सक्षम प्राधिकारी यांनी अभ्यासक्रमनिहाय खालीलप्रमाणे नमूद केलेल्या अंतिम दिनांकापर्यंत वितरित केलेले नॉन-क्रीमी लेअर प्रमाणपत्र आहेत.

तसेच ज्या विद्यार्थ्यांना आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्ग (EWS) अथवा शिक्षण शुल्क माफी योजना (TFWS) अंतर्गत राखीव जागांवर प्रवेश प्राप्त झाला आहे, अशा विद्यार्थ्यांचे आर्थिक वर्ष २०२६-२०२७ साठी ग्राह्य असलेले विहित नमुन्यातील आर्थिकदृष्ट्या मागास प्रमाणपत्र अथवा आर्थिक वर्ष २०२५-२०२६ चा उत्पन्नाचा दाखला सक्षम प्राधिकारी यांनी अभ्यासक्रमनिहाय खालीलप्रमाणे नमूद केलेल्या अंतिम दिनांकापर्यंत वितरित केलेले आहेत

| अ.क्र. | .प्रथम वर्ष बीबीए बीसीए पदवी | Last date of application for admission |
|---|---|---|
| १ | BBA / BCA/BMS/MBA Integrated प्रवेश करण्याचा अंतिम दिनांक ) Cut off date) | १४.०९.२०२६ |
| २ | BBA /BMS/MBA Integrated या अभ्यासक्रमास सक्षम प्राधिकाऱ्यांनी नॉनक्रीमी लेअर-, जात प्रमाणपत्र, आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्ग प्रमाणपत्र व उत्पन्नाचा दाखला निर्गमित केल्याचा अंतिम दिनांक | ०८.०९.२०२६ |
| ३ | BCA या अभ्यासक्रमास सक्षम प्राधिकाऱ्यांनी नॉनक्रीमी -लेअर, जात प्रमाणपत्र, आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्ग प्रमाणपत्र व उत्पन्नाचा दाखला निर्गमित केल्याचा अंतिम दिनांक | १०.९.२०२६ |
| ४ | BBA /BMS/MBA Integrated या अभ्यासक्रमास ST प्रवर्गातील जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याचा अंतिम दिनांक | ०८.०९.२०२६ |
| ५ | BCA या अभ्यासक्रमास ST प्रवर्गातील जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याचा अंतिम दिनांक | १०.०९.२०२६ |
| ६ | SC, VJNT, SBC, SEBC & OBC प्रवर्गातील जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याचा अंतिम दिनांक (ST प्रवर्ग वगळून) | शासन परिपत्रक क्र.सीबीसी - २०२५/प्र.क्र.१३१/मावक दि .०४.०९. |

| | | |
|---|---|---|
| | | २०२६ अन्वये जात वैधता प्रमाणपत्र सदरील शासन परिपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून ३ महिन्यांच्या आत जमा करणे बंधनकारक आहे. |

संस्थेचे सील

प्राचार्य

नाव व स्वाक्षरी

संस्थेच्या लेटरहेडवर प्रिंट काढण्यासाठी

जावक क्र. दिनांक

संस्थेचा डीटीई कोड

**शुल्क परताव्याबाबत तक्रार नसल्याचे प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ च्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमध्ये व संस्थास्तरावर प्रवेश प्रक्रियेमध्ये------------------------------------------------------ **[संस्थेचे नाव व डीटीई कोड]** या संस्थेमध्ये प्रथम वर्ष **बीबीए-बीसीए** पदवी अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे शुल्क परताव्याबाबत आज दिनांक ------------------ पर्यंत संस्थेकडे कोणतीही तक्रार नाही.

संस्थेचे सील

प्राचार्य

नाव व स्वाक्षरी

# गुणवत्ता यादी पडताळणी अहवाल

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील (प्रथम/व्दित्तीय पदवी व पदव्युत्तर पदवी अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र व्यवस्थापनशास्त्र, वास्तुशास्त्र इत्यादी अभ्यासक्रमास प्रवेशित विद्यार्थ्याच्या गुणवत्ता यादी पडताळणी अहवाल

संस्थेचा कोड व नाव :-

समन्वयक अधिकाऱ्याचे नाव व मोबाईल नंबर :-

| अ.क्र. | संस्था कोड | संस्थेचे नाव व पत्ता | एकूण प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या | त्रुटींची संख्या (नसल्यास निरंक टाकावे) | त्रुटींचे स्वरुप (शाखा यादी मधील अनुक्रमांक व त्रुटी) | यादी तपासणी अधिकाऱ्याचं नाव,पदनाम,भ्रम्नध्वनी क्र. |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |
| | | | | | | |

**तपासणी अधिकारी स्वाक्षरी (दिनांकासह) व शिक्का**